# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

**(जिल्हा नियंत्रणक कक्ष) / (आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांकः ०८/०४/२०२०

(ई-मेलने/टपालाने) आपत्ती प्राधान्य

**वाचाः-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०, १४/०३/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत नोव्हेल कोरोना विषाणू (nCoV-19) संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत आणि त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू नये म्हणून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. तसेच सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती जालना जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

माझे असे निर्दशनास आले आहे की, सद्यस्थितीत जिल्हयातील विविध खाजगी रुग्णालयांमध्ये INFLUENZA LIKE ILLNESS (ILI) आणि SARI (SEVERE ACUTE RESPIRATORY ILLNESSES) असणारे रुग्ण मोठया प्रमाणात दाखल होत आहे.

या पार्श्वभूमीवर **मी, रविंद्र बिनवडे, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, जालना** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि महाराष्ट्र कोव्हीड अधिनियम आणि साथ रोग नियंत्रण अधिनियम मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारानुसार नोव्हेल कोरोना विषाणू (nCoV-19) चा वाढत्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने जिल्हयात करावयाची पूर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व खाजगी रुग्णालयांनी / डॉक्टरने या आदेशात नमुद लिंक चा वापर करून त्यांच्या रुग्णालयातील असे रुग्ण ज्यांना सर्दी, ताप, खोकला, इत्यादी लक्षणे आहेत INFLUENZA LIKE ILLNESS (ILI) and SARI (SEVERE ACUTE RESPIRATORY ILLNESSES) असे रुग्णांची माहिती न चुकता भरावी. सदरील माहिती भरणे हि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व खाजगी रुग्णालयांनी / डॉक्टरांना बंधनकारक करण्यात येत आहे.

Form Link : https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf8jaDX07m1CL16s9G8X9YClGMyBo82aXVr5EvuBC7vR1SiJw/viewform

उपरोक्त आदेशांचे पालन न करणा-या व्यक्ती, अधिकारी/कर्मचारी, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ आणि भा.द.वि. १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी कार्यालय जालना सत्यमेव जयते

Rawt

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

प्रति,

१) जिल्हयातील सर्व खाजगी रुग्णालय / डॉक्टर (मार्फत जिल्हा शल्य चिकित्सक, जालना)

२) पोलीस अधिक्षक, जालना यांना माहितीस्तव.

३) जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

५) जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, जि.अ.का.जालना यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.